महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/ 3548 /2024-25 दिनांक :- 19/12/2024

**केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मुख्य परीक्षा-2024 उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्त्व चाचणी/मुलाखत परीक्षेसाठी एकरकमी अर्थसहाय्य अर्थसहाय्य योजनेचे तपशील**

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील केंद्रीय लोकसेवा आयोग मुख्य परीक्षा-2024 (दि.09/12/2024 रोजी UPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व चाचणी/मुलाखत परीक्षेसाठी एकरकमी अर्थसहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. विद्यार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. विद्यार्थी नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती ती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
3. विद्यार्थी हा केंद्रीय लोकसेवा ओयाग मुख्य परीक्षा-2024 (दि.09/12/2024 रोजीच्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेला असावा.ज्या विद्यार्थ्यांना सदर परीक्षेसाठी इतर संस्था/सारथी, पुणे यांचेकडून अर्थसहाय्य मिळत असल्यास अश्या विद्यार्थ्यांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड
2. जात प्रमाणपत्र
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
4. UPSC - 2024 मुख्य परीक्षेचे प्रवेश पत्र
5. UPSC - 2024 मुख्य परीक्षेचा निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक असावा.)

**अर्ज कसा करावा**:-

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील "Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified (UPSC) Interview -2024" यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.
2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.31/12/2024 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. चालू आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारचा अर्थसहाय्याचा लाभ घेतलेला विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
5. कोणत्याही माध्यमातुन व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे आढळल्यास तो/ती कायदेशीर कार्यवाईस पात्र राहील.
6. विद्यार्थाचे बँक खाते आधार क्रमांकाशी संलग्न असणे आवश्यक आहे.
7. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा : **0712-2870120/21**.
   **E-mail Id** : mahajyotingp@gmail.com

स्वा
(प्रशांत वावगे)
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी,**
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर